
ePaper **डॉ. प्रकाश आमटे प्रकृती अस्वास्थ्यामुळे पुण्यातील खासगी रुग्णालयात दाखल!**



| वर्ष - 6 । अंक - 70 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**

- बालेकिल्ल्यातच राष्ट्रवादीला मोठा धक्का!
- हॉकर्स झोन सर्वेक्षण अन् पुनर्वसन कागदावरच!
- काँग्रेस कार्यकर्त्यांसह राहुल गांधी ईडी कार्यालयात दाखल

www.mahaenews.com | । मंगळवार । दिनांक 14 जून 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



"राज्यात पवार, जाधव, गायकवाड, शेलार, होळकर अशी अनेक आडनावे आहेत की ही आडनावे वेगवेगळ्या जातीत आढळतात. समर्पित आयोगाची भूमिका ही ग्रामसेवक, तलाठी यांच्याकडून निवडणूक आयोगाच्या यादीतील प्रत्येक जातीतील लोकांची माहिती आयोगापर्यंत पोहचवावी, मात्र यात काही चूका होत आहेत. एकच आडनाव एकाच जातीत असल्याचे गृहीत धरून माहिती पाठवली जात आहे. त्यामुळे अशा सदोष माहितीमुळे ओबीसींचा खरा टक्का समोर येणार नाही.

- **छगन भुजबळ, अन्न,** नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री

भाजपाकडून ईडीचा वापर विरोधी पक्षातील नेत्यांची मुस्कटदाबी करण्यासाठी होत आहे. भाजपाची मुळात ताकदच नव्हती. पण, भाजपा वाढण्यास काँग्रेस नेतेच कारणीभूत आहेत. पक्षाने संघर्ष करणारा, पक्षाचे काम करणाऱ्याला ताकद द्यायला हवी. त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहायला हवे. परंतु दुर्देवाने काही गोष्टी पक्षात अशा घडल्या ज्यामुळे नुकसान झाले. काँग्रेसमध्ये संघर्ष करणाऱ्या कार्यकर्त्यांपेक्षा गोड-गोड बोलून पद मिळवणाऱ्यांची चलती आहे.

- **विजय वडेट्टीवार,** बहुजन कल्याण मंत्री



## शॉर्ट न्यूज »

### डॉ. प्रकाश आमटे प्रकृती अस्वास्थ्यामुळे रुग्णालयात दाखल

**। पुणे ।** ज्येष्ठ समाजसेवक डॉ. प्रकाश आमटे यांना प्रकृती अस्वास्थ्यामुळे पुण्यातील खासगी रुग्णालयात उपचारांसाठी दाखल करण्यात आले आहे. डॉ. आमटे हे बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयाच्या दीक्षांत समारंभासाठी पुण्यात आले असता त्यांना ताप आणि खोकल्याचा त्रास जाणवला. म्हणून त्यांना दीनानाथ मंगेशकर रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले आहे. आजाराचे निदान करण्यासाठी तपासण्या आणि उपचार सुरु असून उपचारांना ते प्रतिसादही देत आहेत. सध्या डॉक्टरांनी त्यांना पूर्ण विश्रांतीचा सल्ला दिला आहे.


### राज्यसभेतील यशाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी आज देहूमध्ये

# आज पंतप्रधान नरेंद्र मोदी पुणे दौऱ्यावर, काय होणार चर्चा?

### स्वागतासाठी राजशिष्टाचारानुसार उपमुख्यमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार उपस्थित राहणार

**। । पुणे । महाईन्यूज ।**

जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या शिळा मंदिराच्या लोकार्पण सोहळ्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी मंगळवारी (१४ जून) श्रीक्षेत्र देहू येथे येत आहेत. आषाढी वारीसाठी सोमवारी (२० जून) तुकोबांच्या पालखीचे पंढरपूरकडे प्रस्थान होणार असून, त्यापूर्वी लोकार्पणाचा सोहळा होत असल्याने वारकऱ्यांमध्येही उत्साहाचे वातावरण आहे. नरेंद्र मोदी यांच्या दौऱ्याची केंद्रीय तसेच राज्यस्तरीय पथकाकडून सुरक्षिततेच्या सर्व बाबींची कसून तपासणी करण्यात आली आहे. मंदिर परिसरात मोठा सभामंडप उभारण्यात आला आहे. समारंभात संत तुकाराम पगडीने पंतप्रधानांचे स्वागत करण्यात येणार आहे. पंतप्रधान मोदी हे दोन तास देहू परिसरात असणार आहेत. दुपारी एक वाजून दहा मिनिटांनी मोदी यांचे लोहगाव विमानतळावर आगमन होईल. त्यानंतर विमानतळावरून देहूकडे ते प्रयाण करतील. एक वाजून ४५ मिनिटांनी मंदिर समिती जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज



मंदिर संस्था परिसरात ते दाखल होतील. या ठिकाणी श्री संत तुकाराम महाराज मूर्ती, शिळा मंदिराचा २० मिनिटांचा लोकार्पण सोहळा होईल. दोन वाजून १० मिनिटांनी ते सभेच्या ठिकाणी दाखल होतील.

**पंतप्रधानांच्या पगडीवरील अभंगाच्या ओळींमध्ये बदल**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना जी पगडी घातली जाणार आहे, त्यावरील अभंगाच्या ओळीमध्ये बदल करण्यात आला आहे. 'भले तरी देऊ कासेची लंगोटी, नाठाळाच्या माथी हाणू काठी' या पूर्वीच्या अभंगाच्या ओळी काढून 'विष्णूमय जग वैष्णवांचा धर्म भेदाभेद भ्रम अमंगळ' या ओळी आता पगडीवर कोरण्यात आल्या आहेत.

**पंतप्रधान मोदी-मुख्यमंत्री ठाकरे एका व्यासपीठावर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी मंगळवारी मुंबई दौऱ्यावर येत असून राजभवनमधील कार्यक्रमात मोदी व मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हे एका व्यासपीठावर उपस्थित राहणार आहेत.

# पावसाळ्यापूर्वी शहरातील खड्डे बुजवा!

### जनसंवाद सभेत नागरिकांची मागणी : महापालिका प्रशासनाची तारांबळ

**। पिंपरी । महाईन्यूज ।**

पावसाळ्यापूर्वी सीसीटीव्ही केबलसाठी खोदण्यात आलेले खड्डे बुजवावेत, रस्ता डांबरीकरणाचे कामे लवकर करावीत, ड्रेनेज लाईनची दुरुस्ती करावी, आवश्यक ठिकाणी नव्याने ड्रेनेज वाहिन्या टाकव्यात, वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या रस्त्यावरील मोठ्या प्रमाणात वाढलेल्या झाडांच्या फांद्या छाटण्यात याव्यात, छाटलेल्या झाडांच्या फांद्या, पालापाचोळा तात्काळ उचलण्यात



यावा, अशा विविध मागण्या नागरिकांनी जनसंवाद सभेत केल्या.

महापालिकेच्या आठही क्षेत्रीय कार्यालयांमध्ये आजपार पडलेल्या जनसंवाद सभेत सुमारे 95 नागरिकांनी सहभाग घेऊन तक्रारी आणि सूचना मांडल्या. यात अ, ब, क, ड, इ, फ, ग आणि ह क्षेत्रीय कार्यालयामध्ये अनुक्रमे 14, 10, 6, 5, 10, 13, 20 आणि 17 नागरिकांनी जनसंवाद सभेत उपस्थित राहून आपले म्हणणे मांडले.

आठही क्षेत्रीय कार्यालयातील जनसंवाद सभेत क्षेत्रीय अधिकारी अनुक्रमे शीतल वाकडे, अभिजित हराळे, अण्णा बोदडे, उमाकांत गायकवाड , राजेश आगळे, सीताराम बहुरे, विनोद जळक, विजयकुमार थोरातयांच्यासह स्थापत्य, जलनिस्सारण, पाणीपुरवठा, विद्युत, नगररचना विभागांचे कार्यकारी अभियंता उद्यान, वैद्यकीय, आरोग्य, करसंकलन विभागांचे अधिकारी, कार्यकारी अभियंता, उप अभियंता आदी उपस्थित होते. जनसंवाद सभेमध्ये विविध तक्रारी आणि सूचना मांडण्यात आल्या.

जनसंवाद सभेमध्ये विविध तक्रारी आणि सूचना मांडण्यात आल्या. यामध्ये शहरात लावण्यात आलेलेअनधिकृत फ्लेक्स आणि बोर्ड काढावे, वाहतुकीस अडथळा ठरणारे रस्त्यावरील स्ट्रीट लाईटचे जुने खांब योग्य ठिकाणी हलवावेत, उच्च दाबाने सुरळीत पाणीपुरवठा करावापाटील यांनी या बैठकीत उपस्थित अधिका-यांना दिले. या बैठकीस आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ.के. अनिल रॉय, सहशहर अभियंता रामदास तांबे, आरोग्य कार्यकारी अधिकारी गणेश देशपांडे, क्षेत्रीय अधिकारी शितल वाकडे, अभिजित हराळे, अण्णा बोदडे, उमाकांत गायकवाड, सीताराम बहुरे, विजयकुमार थोरात यांच्यासह विविध विभागांचे कार्यकारी अभियंते, सर्व सहाय्यक आरोग्याधिकारी, आरोग्य निरीक्षक उपस्थित होते.

## शॉर्ट न्यूज »

### सिंहगड रोड हिंगणे येथे नारळाच्या झाडाला लागली आग

पुणे (हिंगणे) । । महाईन्यूज



13 जून रोजी संध्याकाळी सहा वाजताच्या दरम्यान हिंगणे पुणे सिंहगड रोड वादळासह पाऊस सुरू झाल्याने संध्याकाळी साडेसहाच्या दरम्यान नारळाचे झाडावर वीज पडून झाडाला आग लागली ही आग सुमारे तासभर अशीच धगधगत होती व या आगीमुळे झाडाची पेटत असलेली पाने वार्याने उडून आसपासचे घरांवर पडत होती ज्यामुळे गावातील सुमारे दोनशे घरांना आग लागण्याची धोका निर्माण झाला होता परंतु सुदैवाने अग्निशामक दलाने वेळीच ही आग आटोक्यात आणली. आसपासचे परिसरातील अनेक नागरिक आग पाहण्यास सरांडि येथे धावत होते. सुमारे तासभरा अग्निशमन दलाच्या अथक प्रयत्नानंतर ही आग विझल्याने आजूबाजूच्या घरांना आग लागण्याचा धोका टळल्याने नागरिकांनी सुटकेचा श्वास घेतला.

### भोर पंचायत समितीचे सभापती लहूनाना शेलार यांचा काँग्रेसमध्ये प्रवेश

# बालेकिल्ल्यातच राष्ट्रवादीला मोठा धक्का!

## भोरच्या सभापतींचा काँग्रेसमध्ये प्रवेश

।पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी

बालेकिल्ला असलेल्या पुणे जिल्ह्यात काँग्रेसचे आमदार संग्राम थोपटे (Sangram Thopte) यांनी राष्ट्रवादी काँग्रेसला मोठा धक्का दिला आहे. भोर पंचायत समितीचे सभापती लहूनाना शेलार यांनी शेकडो समर्थकांसह राष्ट्रवादीला रामराम करत राज्याचे दुग्धविकास मंत्री सुनील केदार (Sunil Kedar) आणि आमदार थोपटे यांच्या उपस्थितीत काँग्रेसमध्ये प्रवेश केला. त्यामुळे भोर तालुका राष्ट्रवादी काँग्रेसला लागलेली गळती थांबायचे नाव घेत नाही. आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा राष्ट्रवादीला धक्का मानला जात आहे.



आमदार संग्राम थोपटे होते. याच मेळाव्यात सभापती लहूनाना शेलार यांनी राष्ट्रवादीचा त्याग करत काँग्रेसमध्ये प्रवेश केला. या कार्यक्रमास काँग्रेसचे सातारा जिल्हा प्रभारी श्रीरंग चव्हाण, शैलेश सोनवणे, नाना राऊत, आण्णा भिकुले, कृष्णाजी शिनगारे, बाळासाहेब थोपटे, विठ्ठल आवाळे, स्वरुपा थोपटे, गीतांजली शेटे, गीता आंबवले, धनंजय वाडकर, रोहन बाठे, नितीन दामगुडे, राहुल लेकावळे, राजगडचे उपाध्यक्ष पोपट सुके व सर्व संचालक उपस्थित होते.

शेलार म्हणाले की, मागील पाच वर्षांत पंचायत समितीमध्ये सदस्य, उपसभापती व सभापती म्हणून काम करत असताना जो त्रास पक्षामधूनच देण्यात आला, तो विरोधकांनीही कधी दिला नाही. आमच्या कुटुंबाने दिवंगत काशिनाथराव खुटवड यांना कायम साथ दिली. आम्हीदेखिल त्याच भुमिकेतून काम करत होतो; परंतु पक्षामध्ये कायम अपमानास्पद वागणूक देत घुसमट करण्यात आली. राष्ट्रवादीचे वरिष्ठ नेते व सर्वसामान्य कार्यकर्ते यांनी कायम साथ दिली. पण, मधल्या नेत्यांच्या फळीने कोणतेही कारण नसताना कायमच दुस्वास केला. त्याला कंटाळून पक्षभेद विसरून काम करणारे आमदार संग्राम थोपटे यांचे नेतृत्व स्वीकारुन आज काँग्रेस पक्षात प्रवेश करत आहे, त्यांच्या मागे ठामपणे उभे राहत काँग्रेस पक्षाची ताकद वाढवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे शेलार यांनी सांगितले.

मंत्री केदार यांनी लहुनाना शेलार व कार्यकर्त्यांचे काँग्रेस पक्षात स्वागत केले. काँग्रेस हा इतिहास असलेला पक्ष आहे. कितीही संकटे आली तरी काँग्रेस कार्यकर्ते डगमगत नाहीत. लोकनेता कसा असावा, हे संग्राम थोपटे यांच्याकडे पाहिल्यावर समजते. त्यांनी त्यांच्या वडिलांचा वारसा समर्थपणे पेलला आहे. पुणे जिल्ह्यात अनेक अव्हाने असताना त्यांची काँग्रेसचा विचार ठाम ठेवला आहे, याची काँग्रेस पक्ष निश्चित दखल घेईल, त्यांचे भविष्य निश्चित चांगले

### त्यांच्या कार्यकर्त्यांना योग्य तो सन्मान दिला जाईल

आमदार संग्राम थोपटे म्हणाले की, राज्यात अघाडी सरकार असताना भोर तालुक्यात निव्वळ आम्हाला विरोध म्हणून व्यक्तीदोषी राजकारण केले जाते. पण, आमचे सर्वांना बरोबर घेऊन जायचे धोरण असते, त्यामुळेच मागील काही दिवसात राष्ट्रवादीचे तीन नेते व आता लहुनाना शेलार यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. लहुनाना शेलार कुटुंबीयांनी माजी आमदार खुटवड यांच्यासाठी जीवाचे रान केले; परंतु त्यांना योग्य वागणूक मिळत नसल्याने त्यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे. त्यांना व त्यांच्या कार्यकर्त्यांना योग्य तो सन्मान दिला जाईल. सूत्रसंचालन विठ्ठल पवार यांनी केले, तर तालुकाध्यक्ष शैलेश सोनवणे यांनी आभार मानले.

### राष्ट्रवादीचा आणखी नेता काँग्रेसमध्ये जाणार!

मागील काही दिवसांत लहूनाना शेलार यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे चार नेते काँग्रेसमध्ये दाखल झाले आहेत. येत्या काही दिवसांत राष्ट्रवादीचा आणखी एक बडा नेता काँग्रेसमध्ये येत आहे. राष्ट्रवादीचा एकुण एक कार्यकर्ता काँग्रेसमध्ये आणल्याशिवाय आमचे कार्य पूर्ण होणार नाही, असा इशारा भोरचे काँग्रेसचे आमदार संग्राम थोपटे यांनी राष्ट्रवादीला दिला. भोर पंचायत समितीचे सभापती लहू शेलार यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी काँग्रेसची साथ सोडत आज (ता. १३ जून) काँग्रेसचा हात हाती घेतला. काँग्रेसमध्ये त्यांचे स्वागत दुग्धविकास आणि पशुसंवर्धन मंत्री सुनील केदार आणि संग्राम थोपटे यांनी केले. त्या कार्यक्रमात बोलताना आमदार थोपटे यांनी वरील गौप्यस्फोट केला. यापूर्वी राजगड सहकारी साखर कारखान्याचे विद्यमान संचालक शिवाजीराव कोंडे आणि अशोक शेलार तसेच, जिल्हा परिषदचे माजी सभापती बाळकृष्ण दळवी यांनी राष्ट्रवादी सोडून थोपटेंच्या नेतृत्वाखाली काँग्रेसमध्ये प्रवेश केलेला आहे.

# राज्यसभा निवडणुकीत राज्यातील महाविकास आघाडी सरकारला धक्का

## माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची पुण्यात प्रथमच भेट होणार

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

नुकत्याच झालेल्या राजसभा निवडणुकीत राज्यातील महाविकास आघाडी सरकारला धक्का दिल्यानंतर प्रथमच माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची मंगळवारी (१४ जून) पुण्यात प्रथमच भेट होणार आहे. प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील हे ही यावेळी उपस्थित असतील. त्यामुळे या भेटीत पंतप्रधान नरेंद्र मोदी या दोघांशी काय संवाद साधणार, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.



दरम्यान, सोमवारी मिळालेल्या माहितीनुसार मोदी यांच्या स्वागतासाठी राजशिष्टाचारानुसार उपमुख्यमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार उपस्थित राहणार आहेत.

श्री क्षेत्र देहू येथील जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराजांच्या शिळा मंदिराच्या लोकार्पण सोहळ्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी मंगळवारी देहूत येणार आहेत. पंतप्रधान मोदी यांच्या या दौऱ्याच्या निमित्ताने भाजप नेते, माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.

राज्यसभेच्या निवडणुकीत देवेंद्र फडणवीस यांच्या रणनीतीमुळे भाजपची सहावी जागा निवडून आली होती. भाजपचे उमेदवार धनंजय महाडीक यांनी शिवसेनेचे उमेदवार संजय पवार यांचा पराभव केला होता.

» भाजपच्या या विजयाने शिवसेनेला मोठा धक्का बसला होता. येऊ घातलेल्या विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपच्या या विजयाची राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे.

भाजपच्या या विजयाने शिवसेनेला मोठा धक्का बसला होता. येऊ घातलेल्या विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपच्या या विजयाची राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे.

» श्री क्षेत्र देहू येथील जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराजांच्या शिळा मंदिराच्या लोकार्पण सोहळ्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी मंगळवारी देहूत येणार आहेत. पंतप्रधान मोदी यांच्या या दौऱ्याच्या निमित्ताने भाजप नेते, माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.

या निवडणुकीनंतर प्रथमच पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि देवेंद्र फडणवीस यांची भेट होत आहे. त्यामुळे या भेटीची आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी देवेंद्र फडणवीस आणि चंद्रकांत पाटील यांच्याबरोबर काय संवाद साधणार, याची चर्चा सुरू झाली आहे.

## शॉर्ट न्यूज »

### पालखी सोहळ्यापूर्वी आकुर्डीतील रस्त्याचे काम पूर्ण करण्याची मागणी

।पिंपरी चिंचवड ।महाईन्यूज

पालखी सोहळ्यापूर्वी आकुर्डीतील मुख्य बाजार पेठ मधील रत्याचे सिमेंट कॉन्क्रीटीकरण करण्याचे काम पूर्ण करण्याची मागणी विठ्ठल प्रतिष्ठानचे अध्यक्ष निखिल दळवी यांनी केली आहे. आकुर्डी मुख्य बाजार पेठ मधील रत्याचे सिमेंट कॉन्क्रीटीकरण करण्याचे काम बरेच दिवसांपासून सुरु आहे. आत्ता ज्या ठिकाणी काम चालू आहे. त्या ठिकाणी खुप मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. विठ्ठल रुक्मिणी मंदिर विठ्ठलवाडी कडून आकुर्डी मेन रोडकडे येणार रस्ता सिमेंट कॉन्क्रीटकरण करण्याच्या कामामुळे एक महिन्या पासून बंद ठेवण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांना मोठा वळसा घालून विठ्ठलवाडीकडून आकुर्डी बाजार पेठ मेन रोडकडे जावे लागत आहे.

### हॉकर्स झोन करण्यात पालिका प्रशासन अपयशी

# हॉकर्स झोन सर्वेक्षण अन् पुनर्वसन कागदावरच!

### एकीकडे अतिक्रमण कारवाई दुसरीकडे फेरीवाले उघड्यावर

।पिंपरी-चिंचवड । ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

पिंपरी । महापालिकेच्या वतीने सन २०१४ हॉकर्स झोन पॉलिसी (फेरीवाल धोरण राबविण्यासाठी सर्वेक्षण) करण्यात आले. यास आठ वर्षे झाली. मात्र अद्यापही

हॉकर्स झोन करण्यात पालिका प्रशासन अपयशी ठरले आहे. त्यामुळे, यांना स्मार्ट सिटीत आपले हक्काचे ठिकाण नसल्याचे चित्र आहे. क्षत्रिय कार्यालयांमधून हॉकर्स सर्वेक्षण आणि त्यांचे पुनर्वसन करण्यात येणार होते मात्र दोन वर्षे झाली तरी हे काम अद्यापही कागदावरच आहे.

दरम्यान पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने गेले पंधरा दिवस शहरात जोरदार अतिक्रमण हटाव कारवाई केली. यामध्ये रस्त्याच्याकडेला असणारे फेरीवाले, पथारीवाले, छोटे मोठे व्यावसायिक या सर्वांना हटवून अतिक्रमण काढण्यात आले. मात्र आता या फेरीवाल्यांना, छोट्या मोठ्या व्यावसायिकांना अद्यापही पुनर्वसनाच्या जागा निश्चित करण्यात आलेले नसल्यामुळे हे व्यावसायिक उघड्यावर पडले आहेत.

फेरीवाल्यांचे सर्वेक्षण करून त्यांना गाळे देण्याचा निर्णय पालिकेने २०१४ मध्ये घेतला. हॉकर्स झोननुसार २४६ जागा निश्चित करण्यात आल्या. यामध्ये तब्बल दहा हजार फेरीवाल्यांची नोंद करण्यात आली होती. कागदपत्रे सादर करणाऱ्या सुमारे ५ हजार फेरीवाल्यांना ओळखपत्र देखील पालिकेच्या वतीने देण्यात आली.

फेरीवाल्यांचे सर्वेक्षणकरणे, पालिका जागांचे सर्वेक्षण करणे, गाळे बांधून देणे आणि या फेरीवाल्यांचे पुनर्वसन करणे या कामाच्या निविदा प्रसिद्ध करण्यात आली मात्र या कामाच्या निविदेस प्रतिसाद मिळाला नाही. त्यानंतर केवळ 8 क्षेत्रीय कार्यालयामार्फत निविदा काढण्यात आली. याला दोन वर्ष झाले तरी हे काम सुरू झाले नाही.



**जागा निश्चित झाल्यानंतर फेरीवाल्यांचे सर्वेक्षण- आयुक्त**

फेरीवाल्यांचे सर्वेक्षण झाल्यानंतर ते सध्या आहे त्या जागेवर आपला एक सांगतात. त्यामुळे भविष्यात वाद निर्माणात होतजो. त्यामुळे जागा निश्चित होत नाहीत. तोपर्यंत सर्वेक्षण सुरू न करण्याचा निर्णय घेतला आहे. योजना अधिक सक्षमपणे राबविण्यासाठी प्रशासन प्रयत्न करीत आहेत असे आयुक्त तथा प्रशासक राजेश पाटील यांनी सांगितले.



> “ प्रशासनाने अतिक्रमण कारवाई करत टपरी, हॉकर्स पथारी यांसारख्या 5000 हून अधिक व्यावसायिकांना विस्थापित केले आहे. अतिक्रमणे हटवताना पालिकेकडे कोणतीही होकर्स पॉलिसीचे निश्चित धोरण किंवा आराखडा नाही. दुसरीकडे दाखवण्यापुरते कुठेतरी गावठाण भागांमध्ये गाळे उपलब्ध करून दिल्याचा देखावा सुरू आहे. प्रशासनाला हे चांगल्या प्रकारे माहिती आहे की हातावर पोट असणारे हे व्यवसायिक कुठेही अतिक्रमण कारवाईला विरोध करणार नाही. न्यायालयात जाण्याची भूमिका मांडणार नाहीत. त्यामुळे आमच्यावर प्रकारे त्यांच्यावर अन्याय झाला आहे.
>
> - बाबा कांबळे, अध्यक्ष, कष्टकरी कामगार पंचायत

# नागरिकांच्या सोयीसाठी शहरात आणखी ५३ सुविधा केंद्र!

### महापालिका प्रशासनाची माहिती : विविध भागांतील 20 अर्जदार ठरले पात्र

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

नागरिकांना नजीकच्या ठिकाणी विविध विभागांचे दाखले, परवाने उपलब्ध व्हावेत, यासाठी महापालिकेमार्पâत सातव्या टप्प्यात आणखी ५३ नागरी सुविधा वेंâद्र खासगी तत्वावर सुरू करण्यात येणार आहेत. त्यासाठी ३३ अर्जदारांमधून २० अर्जदार पात्र ठरले आहेत.

पिंपरी - चिंचवड महापालिकेची शहरात ७५ नागरी सुविधा केंद्रे आहेत. नागरिकांना त्यांच्या घराजवळ महापालिका तसेच विविध विभागाकडील सेवा सुविधा एकाच ठिकाणी आणि निश्चित कालावधीत उपलब्ध होण्यासाठी ही सुविधा वेंâद्रे उपयोगी ठरत आहेत. शहरात प्रभागनिहाय एक ते सहा टप्प्यांमध्ये सध्या ७५ ठिकाणी नागरिकांकडून सेवा शुल्क आकारून खासगी तत्वावर नागरी सुविधा वेंâद्र कार्यान्वित आहेत. या केद्रांमार्पâत महापालिकेच्या सेवा तसेच महाऑनलाईनच्या सेवा पुरविण्यात येतात. त्यामध्ये उत्पन्नाचा दाखला, रहिवाशी दाखला, रेशनकार्ड, दुबार रेशनकार्ड, जातीचा दाखला, हॉटेल परवाना, नॉन क्रीमीलेअर, संजय गांधी निराधार योजना, स्वावलंबन योजना, राष्ट्रीयत्व दाखला, श्रमजीवी कुटूंब कल्याण योजना आदी विविध प्रकारच्या सेवा याठिकाणी मिळतात. नागरी सुविधा वेंâद्रामार्पâत महापालिकेच्या सेवा पुरविण्याकरिता प्रति अर्ज २० रूपये इतके शुल्क आकारण्यात येते. तसेच महाऑनलाईनच्या सेवा पुरविण्यासाठीही २० रूपये शुल्क आकारण्यात येते. त्यातील पाच रूपये महापालिकेला प्राप्त होतात.

पिंपरी -चिंचवड शहरातील शहरातील वाढणारी लोकसंख्या विचारात घेऊन नागरिकांना महापालिकेच्या सेवा, सुविधा उपलब्ध होण्यासाठी आणि नवीन प्रभाग रचनेनुसार सर्व निवडणूक प्रभाग कार्यक्षेत्रांमध्ये प्रत्येकी चार नागरी सुविधा वेंâद्र स्थापन करण्याचे धोरण आहे. त्याकरिता ३ नोव्हेंबर २०२१ रोजी सातव्या टप्प्यात एवूâण ५३ ठिकाणांसाठी नागरी सुविधा वेंâद्र सुरू करण्यासाठी जाहिरातीद्वारे नागरिकांकडून अर्ज मागविण्यात आले होते.

सातव्या टप्प्यातील ५३ ठिकाणांसाठी नागरी सुविधा वेंâद्र सुरू करण्याकरिता ३३ जणांनी अर्ज केला. त्यापैकी २० जण पात्र ठरले. या वेंâद्रचालकांना महापालिका निश्चित




# कोयत्याने मारून महिलेवर बलात्कार करण्याची धमकी

### सदोष मनुष्यवधाच्या प्रयत्नाप्रकरणी एकास अटक

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

महिलेच्या घरात कोयता घेऊन घुसून 'तुझा नवरा पोलिसांचा खबरी झाला आहे का त्याने माझ्याविरोधात पोलीस स्टेशनला तक्रार दिली. तुला मारून टाकतो' असे म्हणत महिलेला कोयत्याने मारण्याचा प्रयत्न केला. तसेच महिलेला बलात्कार करण्याची धमकी दिली. याप्रकरणी सदोष मनुष्यवधाचा प्रयत्नाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना शुक्रवारी (दि. १०) रात्री साडेअकरा वाजता गांधीनगर देहूरोड येथे घडली.

संदीप दादू खुलसे (वय २२, रा. गांधीनगर, देहूरोड) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी महिलेने देहूरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी संदीप कोयता घेऊन फिर्यादी महिलेच्या दारावर लाथा मारून बळजबरीने घरात घुसला. 'तुझा नवरा पोलिसांचा खबरी झाला आहे का त्याने माझ्याविरोधात पोलीस स्टेशनला तक्रार दिली. तुला मारून टाकतो' असे म्हणत फिर्यादीला जीवे मारण्याच्या उद्देशाने कोयता मारला. फिर्यादीने कोयता



> तुझा नवरा पोलिसांचा खबरी झाला आहे का त्याने माझ्याविरोधात पोलीस स्टेशनला तक्रार दिली. तुला मारून टाकतो' असे म्हणत फिर्यादीला जीवे मारण्याच्या उद्देशाने कोयता मारला. फिर्यादीने कोयता हुकवला. त्यानंतर फिर्यादीला हाताने मारहाण करून जोरात धक्का देऊन भिंतीवर आदळले. त्यानंतर फिर्यादी महिलेला तिच्यावर बलात्कार करण्याची धमकी दिली.

## संपादकीय »

### मुस्लिम उद्रेक भाजपच्या पथ्यावर

***मुस्लीम धर्मियांसाठी परमोच्च श्रद्धेय प्रेषित मोहम्मद पैगंबर यांच्याविषयी भाजपच्या प्रवक्त्या नुपूर शर्मा यांनी एका वृत्तवाहिनीवर ज्ञानवापी मशिदीसंबंधीच्या विषयावर मुलाखत देताना आक्षेपार्ह विधान केले होते. त्यानंतर भाजपचे दिल्लीतील मीडिया प्रमुख नवीन जिंदाल यांनी ट्विट करून प्रेषितांविषयी आक्षेपार्ह मत मांडले होते. या प्रकारानंतर मुस्लीम धर्मियांमध्ये संतापाची लाट उसळली. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन भाजपने नुपूर शर्मा आणि नवीन जिंदाल यांना पक्षातील त्यांच्या पदावरून दीर्घ कालावधीसाठी निलंबित केले आहे. नुपूर शर्मा यांनी त्यांनी केलेल्या विधानाबद्दल माफी मागितली, तसेच आपल्या विधानाबद्दल आपण मुस्लीम अभ्यासकांशी चर्चा करायला तयार आहोत, असेदेखील सांगितले, पण हे ऐकण्याच्या स्थितीत भारतातील मुस्लीम समाज आणि त्यांचे नेते नाहीत. त्यांनी नुपूर शर्मा यांना अटक करण्याची मागणी केली.***

इतकेच नव्हे तर देशभरातील मुस्लीम लोकांनी रस्त्यावर उतरून आंदोलने केली. शुक्रवारी जामा मशिदीत नमाज झाल्यावर मुस्लीम लोक नुपूर शर्मा यांनी केलेल्या विधानावरून आक्रमक झाले. देशभरात नुपूर शर्मा यांच्या विरोधात पोलिसांत तक्रारी दाखल करण्यात आल्या. यात काँग्रेससह काही राजकीय पक्षांचा समावेश आहे. विशेष म्हणजे नुपूर शर्मा आणि नवीन जिंदाल यांच्या प्रेषितांविषयीच्या आक्षेपार्ह विधानानंतर केवळ भारतातच नव्हे, तर आखाती देशांमध्ये निषेध करण्यात आला. त्यावेळी काही जणांनी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे फोटो कचऱ्याच्या डब्यावर लावले आणि त्यावर बुटांचे छापे उमटवले. इतकेच नव्हे तर काहींची मजल भारतीय वस्तूंवर बहिष्कार टाकण्यापर्यंत गेली. आखाती देशांमध्ये पहिल्यांदाच असे घडले असावे. थेट पंतप्रधानांच्या प्रतिमेची विटंबना करण्याची ही पहिलीच वेळ असावी.

मोदींच्या नावाचा सध्या जगभर डंका आहे. मोदी पंतप्रधान झाल्यापासून भारत सगळ्याच बाबतीत आक्रमक होताना दिसत आहे. अगदी चीनसारख्या बलाढ्य देशाला भारत थेट आव्हान देताना दिसत आहे. पाकिस्तानलाही सडेतोड उत्तर दिले जात आहे. केंद्रातील बदललेल्या विचारसरणीचा हा परिणाम आहे. त्याचसोबत धार्मिक बाबतीत भारत अधिक आग्रही झालेला आहे. त्याचाच परिणाम म्हणून अयोध्येत राम मंदिराच्या उभारणीचे काम सुरू झाले.



## आनंदी सकाळ

### 'संत कसे रामकृष्ण हरि जसे, कलीमधे अवतरले।

देव संतांच्या अधीन असतो. या संदर्भात भगवती रुक्मिणी व देवीसत्यभामा यांचा संवाद पाहण्यासारखा आहे. रुक्मिणीमाता म्हणते, 'सत्यभामे, देवाला तुझ्या-माझ्यापेक्षा व स्वत:च्या प्राणापेक्षा भगवद्भक्त आवडतात, म्हणून त्याला वैकुंठात राहणे अथवा शेषावर शयनही नको असते. तो राहतो वैष्णवांच्या घरी.'संत हेच देव, याचे प्रत्यक्ष दर्शन म्हणजे श्रीवासुदेवानंदसरस्वती स्वामीमहाराज आहेत. त्यांचे जीवन मानवतेची गाथाच आहे. त्यांनी 'दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा।' हा विश्वशांती मंत्र दिला. प्रत्यक्ष श्री दत्तात्रेय त्यांच्याशी बोलत व मार्गदर्शन करीत असत. श्री स्वामीमहाराजांनी तीन वेळा अनवाणी पायी भारतभ्रमण करून, लोक कल्याणकारी महान कार्य केले. ते ज्या ज्या ठिकाणी जात असत, तेथील क्षेत्रदेवता त्यांच्या भेटीला येत असत, म्हणून 'संतरूपाने प्रभूच प्रत्यक्ष आहेत,' याची प्रचिती येते. आपल्या भक्ताच्या लीला पाहण्यासाठी भगवंतदेखील उत्सुक असतो.

## युद्ध आमुचे सुरू...




एकेकाळी राज्यसभा किंवा विधान परिषद या वरिष्ठ सभागृहांच्या निवडणुका कधी आल्या आणि कधी गेल्या, हे कळतही नसे. अनेकदा केंद्र आणि राज्यांमध्ये स्पष्ट; कधी कधी तगडे बहुमत असल्याने या निवडणुका ही निव्वळ औपचारिकता ठरत असे. काँग्रेसचे ऱ्हासपर्व सुरू झाल्यापासून राज्यसभांच्या निवडणुका अधिक लक्षवेधी ठरू लागल्या. त्यातच, या निवडणुकांमध्येही पैसा, सेलिब्रिटींच्या महत्त्वाकांक्षा आणि पक्षीय अभिनिवेश शिरल्याने त्या अधिकच मसालेदार झाल्या. या साऱ्या स्थितीचे प्रतिबिंब देशभरात नुकत्याच झालेल्या राज्यसभेच्या निवडणुकांमध्ये पडलेले दिसेल. त्यातच, राष्ट्रपतींची निवडणूक जवळ येत असल्याने



या निवडणुकांना महत्त्व होते. राज्यसभेतील भाजपचे बळ या निवडणुकांनंतर किंचित घटले आहे. असे असले तरी महाराष्ट्र आणि हरयाणा येथील यशामुळे ही घटही काहीशी उणावली. भारतीय जनता पक्षाचे राज्यसभेत ९५ खासदार होते. ताज्या निकालानंतर ते ९२ झाले आहेत. देवेंद्र फडणवीस आणि मनोहरलाल खट्टर यांचे डावपेच यशस्वी झाले नसते तर हे संख्याबळ ९० झाले असते. अर्थात, खट्टर तेथे मुख्यमंत्री आहेत. महाराष्ट्र आणि हरयाणा या दोन्ही ठिकाणी अतिशय चतुराईने मतांची आखणी करण्यात आली. विरोधी उमेदवाराला पहिल्या पसंतीची निर्णायक मते पहिल्या फेरीत मिळू द्यायची नाहीत आणि आपल्या उमेदवारावर दुसऱ्या पसंतीच्या मतांचा पाऊस पडेल, असे नियोजन करायचे, अशी ही खेळी होती. महाराष्ट्रातील सत्ताधारी महाविकास आघाडीला येत्या विधान परिषद आणि त्यापुढच्या निवडणुकांसाठी हा धडा उपयोगी पडेल. नुसता दिग्गज नेत्यांचा फौजफाटा किंवा कॅमेऱ्यासमोर वाचाळपणा करणारे 'पेपर टायगर' पुरेसे पडत नाहीत, हा धडाही या पराभवातून सत्ताधाऱ्यांनी शिकला तर तो हिताचा ठरेल.

तसे पाहिले तर भाजपचे तीन खासदार राज्यसभेतून निवृत्त झाले. त्याच जागांवर नवे तीन गेले. म्हणजे, कागदोपत्री फायदा किंवा तोटा नाही. भाजपने संख्याबळ राखले. मात्र, सहा वर्षांपूर्वीची राजकीय स्थिती आणि आजची स्थिती यात महदंतर आहे. भाजप मोठ्या मित्रपक्षाअभावी एकाकी आहे. विधानसभेतील संख्याबळ २०१४ पेक्षा बरेच घटले आहे. सत्तेचे स्वाभाविक लाभ असतात. ते राज्यात नाहीत. असे असताना धनंजय महाडिक यांना निवडून आणणे, हे देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत पाटील यांचे मोठे यश आहे. अधुनमधून नाराजीचे सूर उमटत असले तरी फडणवीस हे महाराष्ट्र भाजपचे सर्वोच्च नेते आहेत, हे या निकालाने अधोरेखित झाले. राज्यातील सरकार गेल्यानंतर त्यांना व पक्षाला मोठा झटका बसला होता; त्यातून दोघेही बाहेर आल्याची हा निकाल म्हणजे खूण आहे. आता विधान परिषदेच्या मतदानात काय होते, ते समजेलच. मात्र, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या नौबती आता झडू लागतील.

## राजकारण अभिजात भाषेचे...

**अभिजात भाषा दर्जा मिळाल्यावर मराठीच्या जतन-संवर्धनासाठी केंद्राकडून किती निधी मिळणार आहे? दर वर्षी पाचशे कोटी रुपये मिळणार वगैरे साऱ्या गावगप्पा आहेत. ज्या सहा भाषांना अधिकृतपणे अभिजात दर्जा देण्यात आला आहे,**

सन २०१४ मध्ये केंद्रात भाजप सरकार आणि महाराष्ट्रात भाजप-शिवसेना यांचे युती सरकार होते; तरीदेखील फेब्रुवारी २०१४ मध्ये प्रा. पठारे समितीच्या अहवालावर साहित्य अकादमीने अनुकूल शिफारस करूनही, मराठीला अभिजात दर्जा देण्याविषयीचा निर्णय केंद्राने का घेतला नाही? तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २०१८मध्ये याविषयी पाठपुरावा केला होता; पण त्यांनाही त्यात यश आले नाही. का? विद्यमान मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी २४ डिसेंबर २०१९ आणि ७ जून २०२१ रोजी मराठीला अभिजात दर्जा देण्यासंबंधी केंद्र सरकारला विशेष पत्रे पाठवली. अलीकडेच केंद्रीय सांस्कृतिक कार्य मंत्री जी. कृष्णा रेड्डी यांना महाराष्ट्राचे मराठी भाषा मंत्री सुभाष देसाई भेटून, सविस्तर चर्चा करून आले. २७ फेब्रुवारी २०२० रोजी राज्य विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांत मराठी भाषेला अभिजात




दर्जा मिळण्याविषयीचा ठराव सर्वपक्षीय एकमताने मंजूर करण्यात येऊन, केंद्राकडे पाठवण्यात आला. तथापि, केंद्राकडून त्यावर काहीही उत्तर देण्यात आलेले नाही.

महाराष्ट्रातील १२ कोटी मराठी भाषकांचा असा का बरे अपमान करण्यात येतो आहे? मराठीला अशी तुच्छतेची वागणूक का दिली जाते आहे? खोटी आश्वासने देऊन अशी टाळाटाळ का केली जाते आहे? प्रा. रंगनाथ पठारे यांनी अलीकडेच एका वृत्तवाहिनीला मुलाखत देताना सांगितले, की याबाबत महाराष्ट्राच्या सर्व राजकीय पक्षांनी (एकत्रितपणे) जो दबाव निर्माण केला पाहिजे, त्यात ते कमी पडत आहेत आणि ते खरेच आहे. भाषाविषयक आवाज उठवताना, टोकाची भूमिका घेताना दक्षिण भारतातील सर्वपक्षीय खासदार जी एकजूट दाखवतात, तसे महाराष्ट्राचे खासदार करताना दिसत नाहीत. ते वेगवेगळे भांडतात. वेगवेगळी आश्वासने मिळाल्यावर स्वतंत्रपणे गप्प बसतात. सर्वपक्षीय राजकीय इच्छाशक्ती असती, तर मराठीला एव्हाना अभिजात दर्जा मिळालाच असता.

अभिजात भाषा दर्जा मिळाल्यावर मराठीच्या जतन-संवर्धनासाठी केंद्राकडून किती निधी मिळणार आहे? दर वर्षी पाचशे कोटी रुपये मिळणार वगैरे साऱ्या गावगप्पा आहेत. ज्या सहा भाषांना अधिकृतपणे अभिजात दर्जा देण्यात आला आहे, त्यांच्याबाबतही केंद्राची भेदभावाची वृत्ती लोकसभेतील प्रश्नोत्तरांमधून स्पष्ट झाली आहे.

## ।। अभंगवाणी ।।



मरणाही आधीं राहिलों मरोनी ।
मग केलें मनीं होतें तैसें ॥१॥
आतां तुम्ही पाहा आमुचें नवल ।
नका वेचूं बोल वांयांविण ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## श्री धुंदीबाबा विद्यालय विद्यानगर म्हणजेच गुणवत्तेने पास होण्याची खात्री - प्रा. साळुंखे

# श्री धुंदीबाबा विद्यालय विद्यानगरमध्ये विद्यार्थी तावून सुलाखून घडतात!

### प्राचार्य भरत साळुंखे यांचे प्रतिपादन; तब्बल 20 वर्षानंतर इयत्ता 10 वीच्या 2003 सालच्या बॅचचे स्नेहसंमेलन उत्साहात

| मेढा (ता. जावली) |
महाईन्यूज | सुनील आढाव |

स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद असलेले रयत शिक्षण संस्थेचे श्री धुंदीबाबा विद्यालय विद्यानगर म्हणजे हमखास पास होण्याची जणू खात्रीच. या शाळेतून ग्रामिण भागातील मुले तावून सुलाखूनच बाहेर पडतात. रयत शिक्षण संस्थेचे हे विद्यालय असल्यामुळे शिक्षक प्रत्येक विद्यार्थ्याकडे काळजीपूर्वक, आपुलकीने लक्ष देतात. शिक्षकवृंद देखील विद्यार्थ्यांना कोणतीच अडचण येऊ देत नाहीत, असे प्रतिपादन या शाळेत तब्बल 18 वर्षे सेवा दिलेले सेवानिवृत्त प्रा. भरत साळुंखे यांनी व्यक्त केले. तब्बल 20 वर्षानंतर इयत्ता 10 वीच्या 2003 सालच्या बॅचच्या स्नेहसंमेलन सोहळ्याचे तसेच गुरुवंदन सोहळ्याचे आयोजन माजी विद्यार्थ्यांनी केले होते. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून प्रा. साळुंखे बोलत होते. पुन्हा एकदा मला शाळेत जायचंय असा हट्ट धरत, श्री. धुंदीबाबा विद्यालय विद्यानगर माध्यमिक शाळेच्या सन 2003 च्या इयत्ता 10 वीच्या बॅचच्या विद्यार्थ्यांनी स्नेहमेळाव्याच्या निमित्ताने पुन्हा तो वर्ग भरविला.

शाळेतील शिस्त, मागच्या बाकावर केलेली मस्ती आणि विद्यार्थ्यांना चूक केल्याबद्दल शिक्षकांनी केलेली शिक्षा अशा भरगच्च आठवणींची शिदोरी घेऊन तब्बल 20 वर्षांनी एकत्र येत जुन्या त्या सोनेरी आठवणींना उजाळा दिला. तसेच शिक्षकांची अनेक वर्षानंतरची आदरयुक्त भावनिक भेट सर्वांना सुखावून गेली. यावेळी बोलताना साळुंखे पुढे म्हणाले की, या शाळेच्या आरसीसी इमारतीसाठी माझ्यासह माझ्या सहकार्यांनी खूप खस्ता खाल्ली आहे. वाळूपासून सिमेंटपर्यंत काटकसरीने साहित्याचे नियोजन करून ही आरसीसी इमारत उभी केली. अनेक ग्रामस्थांनी यासाठी आर्थिक मदत देखील केली. इयत्ता दहावीमध्ये गुणवत्ता यादीत प्रथम क्रमांकाने पासआऊट झालेल्या कांचन कदम या विद्यार्थिनीचे कौतुक करताना साळुंखे सर म्हणाले की, लोखंडाला भट्टीतून जसे ताऊनसुलाखून काढले जाते. तेव्हाच कुठे धारदार तलवार तयार होते. अगदी तशीच विद्यादानाच्या भट्टीतून हिला तावून सुलाखून काढली आहे. त्यामुळे आज ही विद्यार्थिनी पाटण तालुक्यातील पाडळोशी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेवर उपशिक्षिका म्हणून कार्यरत आहे. यावेळी आपल्या माजी पत्रकार विद्यार्थ्याचे कौतुक करताना म्हणाले की, सर्वात मोठा परमेश्वर पत्रकार असतो. एखाद्याला उच्चस्थानी पोहोचवू शकतो किंवा भुईसपाट देखील करू शकतो. अशी पाखरे येती आणिक स्मृती ठेवुनी जाती, या कवितेप्रमाणे तब्बल 20 वर्षानंतर शाळेतून दहावीनंतर पुढील शिक्षणासाठी बाहेर पडलेले माजी विद्यार्थी स्नेहमेळाव्यानिमित्त एकत्र आले व सोनेरी आठवणींना उजाळा दिला. सदर कार्यक्रमाचे अध्यक्षपद शाळेचे मुख्याध्यापक श्री. जाधवसर तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे भरत साळुंखे सर व भारती साळुंखे या दांपत्यांने भूषिवले. शाळेतील शिक्षक वृंद यांचा यावेळी सत्कार करून सन्मान करण्यात आला. याप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक जाधवसर, ग्रंथपाल खाडेसर, भूमितीचे शिक्षक निकमसर, क्रीडा शिक्षक करंजे सर, मराठीचे लोहार सर, चित्रकला शिक्षक शिंदे डी. आरसर, गणिताचे अक्षय पवार, लेखपाल शेडगे सर, तांत्रिक सहकार्य लांडे सर आदींची प्रामुख्याने उपस्थिती लाभली. यावेळी व्यक्त होताना शिक्षक व माजी विद्यार्थी भाऊक झाल्याचे पहायला मिळाले. यावेळी सर्वांनी चवीष्ट जेवनाचा पुरेपुर आनंद घेतला. शाळेच्या प्रांगणात माजी विद्यार्थिनींनी आकर्षक रेखाटलेली रांगोळी उपस्थितांचे लक्ष वेधून घेत होती. यासाठी चित्रा शिंदे व कांचन कदम यानी मेहनत घेतली. आजच्या धावपळीच्या व तंत्रज्ञानाच्या टेक्नोसॅव्ही युगात विविध ठिकाणाहून सर्वांना एकत्र करणे फार जिकीरीचे होते. मात्र विद्यालयाचे माजी विद्यार्थी क्रीडापटू ज्ञानेश्वर सुळके, दीपक शिंदे, अनिल महामुलकर, कांचन कदम, गौरव जाधव, मच्छिंद्र गोळे, सचिन पवार, अनुप्रिता चिकणे यांनी ही जबाबदारी अगदी लिलया पार पाडली. ज्याला आपल्या मित्राला भेटण्याची ओढ असते. तो कसाही अशा कार्यक्रमांना उपस्थित राहतो. तो कारणे देत नाही. असे मनोगत मच्छिंद्र गोळे यांनी व्यक्त केले. सूत्रसंचालन दीपक शिंदे यांनी केले तर आभारप्रदर्शन कांचन कदम-सुतार यांनी केले.







#### कार्यक्रमाला उपस्थित माजी विद्यार्थिनी...

सदर कार्यक्रम यशस्वितेसाठी चित्रा शिंदे, कांचन कदम-सुतार, अनुप्रिता चिकणे, आश्विनी भोईटे-जाधव, पवित्रा चिकणे-दिवडे, पल्लवी शिंदे-बोबडे, रेश्मा धनावडे-चौधरी आदींनी प्रामुख्याने उपस्थिती दर्शविली.

#### कार्यक्रमाला उपस्थित माजी विद्यार्थी

कृषी अधिकारी अनिल महामुलकर, अमोल महामुलकर, गौरव जाधव, अक्षय ससाणे, ज्ञानेश्वर सुळके, दीपक शिंदेसर, प्रवीण शिंदे, नवनाथ हिरवे, रणजीत शिंदे, सचिन पवार, चंद्रकांत शिंदे, संदीप शिंदे, सोनगावचे प्रगतशील शेतकरी विजय दुदुस्कर, पत्रकार सुनील आढाव आदींनी प्रामुख्याने उपस्थिती दर्शविली.

## काय काय म्हणाले गुरूजन

समाजातील मुलांना विद्यादान हे निपक्षपातीपणाने केले तरच स्वताची मुले शुशिक्षीत बनतात. आज मी जी सेवा केली ती निर्मोही मनाने केली. त्यामुळे माझ्या मुलांचे करिअर मी घडवू शकलो.
**- शिंदे डी. आर.** कलाशिक्षक

पती-पत्नीमधील गोड संवाद हाच खरा संसार. माझे विद्यार्थी आज जीवनात यशस्वीपणे संसार करत आहेत. याचा मला मनस्वी आनंद आहे. या मुलांच्या भावी आयुष्याला माझ्याकडून खूप खूप सदिच्छा..
**-- तानाजी करंजे,** क्रीडा शिक्षक

श्री धुंदीबाबा विद्यालयात मी भूमिती शिक्षक म्हणून कार्यरत होतो. माझे सर्वच विद्यार्थी चांगल्या गुणांनी पासआऊट झाले. त्यानंतर मी एका शाळेवर पर्यवेक्षक म्हणून रुजू झाले. व पुढे मुख्याध्यापक म्हणून सेवानिवृत्त झालो. या कालावधीत या शाळेचे विद्यार्थी फारच गुणी होते. **- निकम सर,** भूमिती शिक्षक

श्री धुंदीबाबा विद्यालय विद्यानगरचे विद्यार्थी सोन्यासारखे भेटले. मी या शाळेवर हिंदी हाच विषय शिकवायचे. असे विद्यार्थी मला कुठे भेटले नाहीत. मी आज ज्या शाळेवर कार्यरत आहे तिथल्या राजकारणात मी जास्त लक्ष देत नाही. मुलांनो आपल्या मुलाबाळांकडे लक्ष द्या.
**-सौ. भारती साळुंखे,** हिंदी शिक्षिका

मी या शाळेवर ग्रंथपाल म्हणून सुरुवातीपासूनच कार्यरत आहे. मला मिळेत तो विषय मी शिकवायचो सुरुवातीला. या बॅचच्या विद्यार्थ्यांचे मला विशेष कौतुक आहे. कारण ग्रंथपाल म्हणून काम करताना हे विद्यार्थी अनेक पुस्तके वाचायला घेऊन जायचेत.
**-खाडे सर,** ग्रंथपाल

## माजी विद्यार्थ्यांचे मनोगत

आज गुरुवंदन सोहळा. शिक्षकांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस. विद्यार्थी दशेत शिकत असताना भूमिती, गणितातील सूत्रे अनेकांच्या डोक्यावरून जातात. अनेकांना असे वाटते की या सूत्रांचा आपल्या जीवनात काय उपयोग होतो का. पण मी एक सांगतो, पृथ्वी गोल फिरते. ती दिसते का...त्याचप्रमाणे कुठे ना कुठे तरी गणिती सूत्रांचा जीवनात उपयोग होतोच. शाळेने मला भरभरून दिले. मी कायम ऋणात राहीन. हास्ययोग तज्ज्ञ मकरंद टिल्लू सांगतात हसत हसत जगा.
**-अनिल महामुलकर,** कृषि अधिकारी , जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय, सातारा

माणसं ओळखू त्यांच्या सानिध्यात राहणे ही शिकवणच जणू मला या शाळेने दिली. कर्मवीरांचे पाईक होताना देण्यामध्ये जे सुख आहे तेच घेण्यामध्ये दुःख आहे. आयुष्यात लेबल लावून मुखवटे कधीच धारण करु नका. श्री रविशंकर म्हणतात, अज्ञानी का प्रेम हानिकारक हो सकता है, परंतु ज्ञानी का क्रोध कभी हानिकारक नहीं. वह केवल हितकर ही हो सकता है. स्त्री ही जगाची जननी, निर्माती आहे. आपली मुले हीच आपली संपत्ती आहे. त्यांना संस्कारक्षम आयुष्य जगवायला शिकवा. सिद्धहस्त कवी प्रा. अनंता राऊत म्हणतात. दुःख अडवायला उंबऱ्यासारखा, मित्र वणव्यामध्ये गारव्यासारखा..
**-कांचन कदम-सुतार,** उपशिक्षिका, जि. प. प्राथमिक शाळा, पाडळोशी, तालुका पाटण, जिल्हा-सातारा

गणिताच्या शिक्षकांनी जी शिदोरी दिली त्याच शिदोरीच्या जोरावर मी माझ्या कार्यक्षेत्रात नावलौकिक मिळवला आहे. क्रीडा स्पर्धेत मी सदा अग्रेसर असायचो. धावण्याची स्पर्धा असो वा कुस्ती वा कबड्डी मी उत्साहाने सहभागी व्हायचो. या कार्यक्रमाचे मी आयोजन केले. कार्यक्रमाला उपस्थित शिक्षण तसेच सहकारी विद्यार्थी यांचे मनपूर्वक आभारी आहे.
**- ज्ञानेश्वर सुळके,** गरवारे टेक्निकल फायबर्स, वाई

## शॉर्ट न्यूज »

### एस-४०० मिसाईल डिफेन्स सिस्टिम नियोजित वेळेनुसार भारताला मिळणार



| नवी दिल्ली | महाईन्यूज | प्रतिनिधी|

एकीकडे रशिया आणि युक्रेन या देशांमध्ये युद्ध सुरु असताना भारत देशाला रशियाकडून एस-४०० मिसाईल डिफेन्स सिस्टिम वेळेवर आणि कोणताही अडथळा न येऊ देता पुरवल्या जातील असे विधान रशियन राजदूत डेनिस अलिपोव यांनी केले आहे. भारत आणि रशिया यांच्यातील राजनैतिक संबंधाला या वर्षी ७५ वर्षे झाले आहेत. याच पार्श्वभूमीवर रशियामधील डायजेस्ट या नियतकालीकामध्ये अलिपोव यांनी वरील भाष्य केले आहे. भारताने २०१८ साली एस-४०० एअर मिसाईल डिफेन्स सिस्टिम्सच्या खरेदीसाठी पाच मिलियन अमेरिकी डॉलर्सचा रशियासोबत करार केला होता.

### राहुल गांधींच्या समर्थनार्थ मुंबईत काँग्रेसचं आंदोलन

# काँग्रेस कार्यकर्त्यांसह राहुल गांधी ईडी कार्यालयात दाखल!

## काँग्रेसचे बडे नेत या मोर्चात सहभागी

| नवी दिल्ली | महाईन्यूज |

नॅशनल हेराल्डप्रकरणी काँग्रेस खासदार राहुल गांधी यांना ईडीने समन्स बजावले होते. त्यानंतर आज राहुल गांधी यांचा जबाब ईडीपुढे नोदवला जाणार आहे. या विरोधात काँग्रेस कार्यकर्ते आक्रमक झाले आहेत. देशभरात राहुल गांधींच्या समर्थनार्थ कार्यकर्ते रस्त्यावर उतरले असून दिल्लीत काँग्रेस कार्यकर्त्यांसह राहुल गांधी ईडी कार्यालयात दाखल झाले. काँग्रेसचे बडे नेत या मोर्चात सहभागी झाले आहेत.



### राहुल गांधींच्या घरासमोर पोस्टर

महाराष्ट्र काँग्रेसनेही ईडी विरोधात जोरदार आंदोलन केले आहे.सुनो तानाशाहा, तोतों से डरा न पाओगे तुम हाथकंडों से हमें झुका ना पाओगे असे म्हणत भाजपविरोधी घोषणाबाजी केली . नॅशनल हेराल्ड प्रकरणी काँग्रेसचे नेते राहुल गांधी हे आज ईडीसमोर जबाब नोंवण्यासाठी दाखल झाले आहेत. या विरोधात काँग्रेसचे कार्यकर्ते आक्रमक झाले आहेत. दिल्लीत काँग्रेस कार्यकर्त्यांनी राहुल गांधींच्या घरासमोर एक पोस्टर लावले आहे.

### पोलिसांनी नाकारली होती परवानगी

नॅशनल हेराल्ड प्रकरणी काँग्रेस नेते राहुल गांधी आज अंमलबजावणी संचालनालयासमोर हजर झाले आहेत. ईडी कारवायांविरोधात काँग्रेस नेत्यांनी आज काँग्रेस मुख्यालयापासून एपीजे अब्दुल कलाम रोडवरील ईडी मुख्यालयापर्यंत रॅली काढली. मात्र, दिल्ली पोलिसांनी काँग्रेसच्या रॅलीला परवानगी नाकारली आहे. दिल्ली पोलिसांकडून रॅलीला परवानगी न देण्यामागे कायदा व सुव्यवस्थेचे कारण सांगितले होते.

### नॅशनल हेराल्ड प्रकरण नेमकं काय?

'नॅशनल हेराल्ड' हे वर्तमानपत्र पंडित जवाहरलाल नेहरु यांनी सुरू केलं होतं. हे काँग्रेसचं मुखपत्र समजलं जायचं. काही काळातच हे वर्तमानपत्र बंद पडलं. मात्र 2012 मध्ये सोनिया आणि राहुल गांधींच्या 'यंग इंडिया' या कंपनीनं या वर्तमानपत्राचे हक्क पुन्हा विकत घेतलं. मात्र हे वृत्तपत्र पुन्हा सुरू करण्यात आलं नव्हतं. हे हक्क घेताना 1600 कोटींची संपत्ती फक्त 50 लाखांत घेतल्याचा आरोप भाजप नेते सुब्रमण्यम स्वामी यांनी केला होता. त्या प्रकरणी चौकशी सुरू आहे. नॅशनल हेराल्डमध्ये यंग इंडिया, राहुल गांधी आणि सोनिया गांधी यांचा हिस्सा आहेत. सोनिया गांधी आणि राहुल गांधी हे यंग इंडिया प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे संचालक आहेत.

---

# देशभरातील कोरोना रुग्णसंख्येत घसरण

## 24 तासात 8084 नवे रुग्ण, 10 रुग्णांचा मृत्यू

| नवी दिल्ली | महाईन्यूज | वृत्तसंस्था |

देशातील कोरोना रुग्णसंख्येत गेल्या काही दिवसांपासून मोठे चढ-उतार पाहायला मिळत आहे. मात्र देशातील कोरोना रुग्णसंख्येत कालच्य तुलनेच किंचित घट झाली आहे. गेल्या 24 तासात 8084 नव्या कोरोना रुग्णांची नोंद झाली आहे. तर 10 रुग्णांचा मृत्यू झाला आहे. सलग तिसऱ्या दिवशी कोरोनाचे 8 हजारांहून अधिक रुग्ण आढळले आहेत. रविवारी कोरोनाचे 8582 रुग्ण आढळून आले तर चार रुग्णांचा मृत्यू झाला होता. शनिवारी 8329 रुग्ण आढळले होते. केंद्रीय आरोग्य मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, गेल्या 24 तासात 3,482 रुग्ण कोरोनाचे बरे झाले आहेत. यासह सक्रिय रुग्णांची संख्या 47,995 झाली आहे. याशिवाय 10 जणांचा मृत्यू झाला आहे. आतापर्यंत 5 लाख 24 हजार 771 लोकांचा कोरोनामुळे मृत्यू झाला आहे. त्याचबरोबर आतापर्यंत 4 कोटी 26 लाख 57 हजार 335 जणांना डिस्चार्ज देण्यात आला आहे. देशात एकूण 5 लाख 24 हजार 771 रुग्णांचा कोरोनामुळे मृत्यू झाला आहे.



### कोरोना मृत्यांचा दर हा 1.86%

**देशातील सर्वाधिक कोरोना रुग्ण हे महाराष्ट्रात आहे. विशेषत: मुंबई, रायगड, पालघर, मुंबई उपनगर, पुणे या सहा शहरांत कोरोनाचे सर्वाधिक रुग्ण आढळून आले आहेत. दरम्यान राज्यात 2949 नवीन रुग्ण आढळून आले आहेत. त्यातील 1803 कोरोना रुग्ण मुंबईत नोंदवले गेले आहेत. यात 1432 रुग्ण बरे होऊन घरी परतले आहेत. तर आतापर्यंत एकूण 77 लाख 46 हजार 337 रुग्ण कोरोनातून ठीक होऊन घरी गेले आहेत.**

# पैगंबरांच्या नावाखाली हिंसक निषेध सहन करणार नाही

## मुस्लिम संघटना काढणार फतवा

| नवी दिल्ली | महाईन्यूज | वृत्तसंस्था |



भापाच्या निलंबित प्रवक्त्या नुपूर शर्मा यांनी प्रेषित मोहम्मद पैगंबर यांच्याविषयी केलेल्या आक्षेपार्ह विधानानंतर देशात मोठ्या प्रमाणात हिंसाचाराच्या घटना घडल्या आहेत. पैगंबरांच्या नावाखाली देशात चाललेला हिंसक निषेध सहन करणार नसल्याचे जमात उलेमा ए-हिंद या संघटनेनं जाहीर केले आहे. मात्र, इस्लामिक तत्वानुसार नुपूर शर्मा यांना माफ करायला हवे असे आवाहन त्यांनी मुसलमान बांधवांना केले आहे.

जमातचे अध्यक्ष सुहैब म्हणाले की, आम्हाला देशभरात सुरु असलेला हा हिंसाचार मान्य नाही. तसेच भाजपाने नुपूर शर्मांना निलंबित केलं याचे आम्ही स्वागत करतो. पण इस्लामिक तत्वानुसार नुपूर शर्माला माफ केलं जावं.

### लोकांनी कोणत्याही हिंसाचारला पाठिंबा देऊ नये

तसेच लोकांनी कोणत्याही हिंसाचारला पाठिंबा देऊ नये. आम्ही असदुद्दीन ओवैसी आणि मोहम्मद मदानी यांच्याविरोधातही फतवा काढणार असल्याचे सुहैब म्हणाले. तसेच सरकारने मुस्लिम संघटना आणि त्यांना पैसे पुरवणाऱ्यांची चौकशी करावी अशी मागणी सुहैब यांनी केली आहे. जेणेकरून मुस्लिम संघटनांकडून देशात होणाऱ्या हिंसाचारावर आळा बसेल.


# कालीन भैय्या परत येतोय, ‘मिर्झापूर ३’चा उत्सुकता वाढवणारा सीझन



एखाद्या वेबसीरिजचा पहिला सीझन प्रदर्शित झाला की त्याचा दुसरा सीझन कधी येणार याची प्रेक्षक आतुरतेने वाट पाहत असतात. अशीच एक वेबसीरिज म्हणजे ‘मिर्झापूर’. ‘मिर्झापूर’ वेबसीरिजचे आतापर्यंत २ सीझन प्रदर्शित झाले आणि या वेबसीरिजला प्रेक्षकांचा भरभरून प्रतिसाद मिळाला. आता या सीरिजचा तिसरा भाग लवकरच प्रदर्शित होणार आहे. या सीरिजच्या चित्रीकरणादरम्यानचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

या वेबसीरिजमध्ये बीना त्रिपाठी हे पात्र साकारणारी अभिनेत्री रसिका दुग्गलने एक व्हिडीओ शेअर केला आहे. यामध्ये कलाकारांच्या पात्राची नावं असणारी एक एक पेटी दिसत आहे. तसेच व्हिडीओच्या शेवटी “फक्त थोडी प्रतिक्षा करा.” असं रसिका बोलत आहे. या व्हिडीओला काही तासांमध्येच नेटकऱ्यांचा उत्तम प्रतिसाद मिळाला आहे.

# सुशांत सिंगच्या स्मृतीप्रित्यर्थ केदारनाथमध्ये उभारणार फोटोग्राफी पॉईंट



सुशांत सिंग राजपूतच्या स्मृतीप्रित्यर्थ उत्तराखंड सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. सुशांतच्या नावाने केदारनाथ येथे फोटोग्राफी पॉईंट उभारण्यात येणार आहे. १४ जून रोजी सुशांतचा स्मृतीदिन आहे. त्यापार्श्वभूमीवर उत्तराखंड सरकारने हा निर्णय जाहीर केला आहे. सुशांतने केदारनाथ या चित्रपटात महत्त्वाची भूमिका बजावली होती. २०१३ साली केदारनाथ येथे आलेल्या महाप्रलयावर हा चित्रपट आधारित होता.

या चित्रपटाने प्रेक्षकांची चांगलीच वाहवा कमावली. तसेच, या चित्रपटानंतर केदारनाथला जाणाऱ्या भाविकांमध्ये वाढ झाली. त्यामुळे उत्तराखंड सरकारने त्याच्या स्मृतीप्रित्यार्थ फोटोग्राफी पॉईंट बनवण्याचा निर्णय घेतला आहे.

अशाप्रकारचा पॉईंट तयार करण्याचे आदेश उत्तराखंड राज्याचे पर्यटन मंत्री संतपाल महाराज यांनी संबंधित विभागाला दिले आहेत.

सतपाल महाराज म्हणाले की, अभिनेता सुशांत सिंह राजपूत याच्या नावे केदारनाथ येथे फोटोग्राफी पॉईंट बनवण्याचा निर्णय घेतला आहे. त्याने केदारनाथ ही अत्यंत चांगली फिल्म बनवली होती. त्यामुळे त्याचा चांगला फोटो लावून आम्ही श्रद्धांजली अर्पण करणार आहोत. मुख्यमंत्री हरीश रावत यांनी



# ५ वर्ष एकत्र राहिलो अन् आता...” लग्नानंतरच्या आयुष्याबाबत विचारताच रणबीर कपूरने दिलं उत्तर

रणबीर कपूर आणि आलिया भट्टचं लग्न टॉक ऑफ द टाऊन होतं. बरेच वर्ष या दोघांनी एकमेकांना डेट केलं आणि अखेरीस लग्न करण्याचा निर्णय घेतला. लग्नानंतर रणबीर-आलिया लगेचच त्यांच्या कामावरही रुजू झाले. पण लग्नानंतरचं आयुष्य नेमकं कसं आहे? याबाबत रणबीरला एका मुलाखतीदरम्यान विचारण्यात आलं. तेव्हा त्याने स्पष्टपणे आपलं मत मांडलं.

लग्नानंतर आयुष्यामध्ये काही बदल झाले का? असं रणबीरला नुकत्याच झालेल्या एका मुलाखतीमध्ये विचारण्यात आलं. यावेळी तो म्हणाला, “लग्नानंतर आमच्या आयुष्यामध्ये फारसा मोठा बदल काही झाला नाही. आम्ही जवळपास ५ वर्षांपासून एकत्र आहोत. ५ वर्ष एकत्र राहिल्यानंतरच आम्ही लग्न करण्याचा निर्णय घेतला. पण सध्या आम्ही दोघंही आमच्या हातात असलेलं काम पूर्ण करत आहोत.” पुढे बोलताना रणबीरने सांगितलं की, “लग्नाच्या दुसऱ्याच दिवशी आम्ही आमच्या कामाला सुरुवात केली. आलिया तिच्या पुढील चित्रपटाच्या चित्रीकरणाला गेली आणि मी देखील माझ्या चित्रीकरणाला निघून गेलो. मी तर मनालीला चित्रीकरणासाठी गेलो होतो. ‘शमशेरा’ चित्रपट प्रदर्शित झाला आणि आलिया लंडनवरुन पुन्हा परत आली की आम्ही आठवडाभराची सुट्टी घेण्याचा विचार करत आहोत. पण आता असं वाटतं की आमचं लग्न झालंच नाही आहे.”

# “आता मागे न पाहता पुढे जाणे गरजेचे”, - प्राजक्ता माळी



“आता मागे न पाहता पुढे जाणे गरजेचे”, प्राजक्ता माळीची ‘ती’ पोस्ट चर्चेत मराठमोळी अभिनेत्री प्राजक्ता माळी ही लोकप्रिय अभिनेत्रींपैकी एक आहे. प्राजक्ताने आतापर्यंत अनेक मालिकांमध्ये काम केले आहे. ‘जुळून येती रेशीमगाठी’, ‘नकटीच्या लग्नाला यायचं हं’ यांसारख्या प्रसिद्ध मालिकेतून घराघरात पोहोचली. प्राजक्ताने अभिनयाच्या जोरावर प्रत्येक प्रेक्षकाच्या मनात एक वेगळे स्थान निर्माण केलं आहे. सध्या प्राजक्ता ही महाराष्ट्राची हास्यजत्रा या कार्यक्रमाचं सूत्रसंचालन करताना दिसते. त्यासोबतच प्राजक्ता ही सध्या रानबाजार या वेबसिरीजमुळे चर्चेत आहे. यानंतर आता प्राजक्ता ही लवकरच वाय या चित्रपटाद्वारे प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या निमित्ताने नुकतंच प्राजक्ताने एक पोस्ट शेअर केली आहे. प्राजक्ता माळी हिने नुकतंच इन्स्टाग्रामवर एक टिझर शेअर केला आहे. तिचा हा टिझर मुक्ता बर्वेच्या वाय या चित्रपटाचा आहे. हा टिझर पोस्ट करत तिने त्याला एक कॅप्शनही दिले आहेत. “मार्गावरी काटे जरी असंख्य, मला जखमांची तमा नाही, लाख अडथळे आले तरी आता माघारी वळणे नाही..., आता मागे न पाहता पुढे जाणे गरजेचे आहे. ‘ती’ घेऊन येतेय ‘वाय’ चा ट्रेलर, उद्या!”, असे तिने या पोस्टमध्ये म्हटले आहे. तिची ही पोस्ट सध्या चांगलीच चर्चेत आहे.

कंट्रोल एन प्रॉडक्शन निर्मित या चित्रपटाची कथा अजित सुर्यकांत वाडीकर यांची आहे. तर या चित्रपटाची पटकथा आणि संवाद अजित वाडीकर, स्वप्नील सोज्वळ आणि संदीप दंडवते यांनी लिहिलेले आहेत. तर कार्यकारी निर्मात्याची धुरा विराज विनय मुनोत यांनी सांभाळली आहे. हा चित्रपट २४ जून रोजी चित्रपटगृहात प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

## शॉर्ट न्यूज »

### विश्वचषक पॅरानेमबाजी स्पर्धा : अवनीला दुसरे सुवर्ण

। नवी दिल्ली । महाईन्यूज



भारताची युवा पॅरानेमबाज अवनी लेखराने फ्रान्स येथे सुरू असलेल्या जागतिक पॅरा क्रीडा विश्वचषक नेमबाजी स्पर्धेत सलग दुसऱ्या सुवर्णपदकाची कमाई केली. अवनीने महिलांच्या आर८ गटातील ५० मीटर रायफल थ्री-पोझिशन एसएच१ गटात सुवर्ण कामगिरी केली. अवनीने ४५८.३ गुणांची कमाई करत सुवर्णपदक पटकावले. तर व्हेरॉनिका व्हादोव्हिकोव्हा (४५६.६ गुण) आणि स्वीडनची अॅना नॉर्मन (४४१.९ गुण) या अनुक्रमे रौप्य व कांस्यपदक मिळवण्यात यशस्वी ठरल्या.राजस्थानच्या अवनीला अंतिम फेरीच्या सुरुवातीला अपेक्षित खेळ करता आला नाही. मात्र, अखेरच्या तीन फेऱ्यांमध्ये सलग १० गुणांवर लक्ष्य साधत त्याने विजय साकारला. लेखराने यापूर्वी महिलांच्या आर२ गटातील १० मीटर एअर रायफल एसएच१ प्रकारात सुवर्णपदक मिळवले होते.

## भारत-आफ्रिका ट्वेन्टी-20 मालिका

# भारताची पुन्हा हाराकिरी!

### दुसऱ्या सामन्यात आफ्रिका चार गडी राखून विजयी; क्लासन चमकला

। कटक । महाईन्यूज ।



फलंदाजांनंतर गोलंदाजांनी केलेल्या निराशाजनक कामगिरीमुळे यजमान भारताला दुसऱ्या ट्वेन्टी-२० क्रिकेट सामन्यातही दक्षिण आफ्रिकेकडून पराभव पत्करावा लागला. हेन्रिच क्लासनच्या (४६ चेंडूंत ८१ धावा) दमदार खेळीच्या जोरावर आफ्रिकेने हा सामना चार गडी आणि १० चेंडू राखून जिंकला.

रविवारी कटक येथे झालेल्या या सामन्यात भारताने दिलेले १४९ धावांचे आव्हान आफ्रिकेने १८.२ षटकांत गाठले आणि पाच सामन्यांच्या या मालिकेत २-० अशी आघाडी मिळवली. आव्हानाचा पाठलाग करताना आफ्रिकेच्या डावाची अडखळती सुरुवात झाली. भुवनेश्वर कुमारने रीझा हेन्ड्रिक्स (४), ड्वेन प्रिटोरियस (४) आणि रासी व्हॅन डर डसन (१) यांना झटपट बाद करत आफ्रिकेची ३ बाद २९ अशी स्थिती केली. मात्र, क्लासनने कर्णधार टेम्बा बव्हुमाच्या (३० चेंडूंत ३५) साथीने आफ्रिकेचा डाव सावरला. या दोघांनी ६४ धावांची भागीदारी रचली. बव्हुमाला यजुर्वेद्र चहलने माघारी पाठवल्यावर क्लासनला डेव्हिड मिलरची (१५ चेंडूंत नाबाद २०) साथ लाभली. क्लासनने ४६ चेंडूंत सात चौकार आणि पाच षटकारांच्या साहाय्याने ८१ धावांची खेळी केल्यावर त्याला हर्षल पटेलने बाद केले. मात्र, मिलरने एक बाजू लावून धरत आफ्रिकेचा विजय साकारला.

तत्पूर्वी, भारताने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ६ बाद १४८ अशी धावसंख्या उभारली. ऋतुराज गायकवाड (१) छाप पाडण्यात अपयशी ठरला. मग इशान किशन (२१ चेंडूंत ३४) आणि श्रेयस अय्यर (३५ चेंडूंत ४०) यांनी दुसऱ्या गड्यासाठी ४५ धावांची भर घातली. मात्र, या दोघांनाही चांगल्या सुरुवातीचे मोठ्या खेळीत रुपांतरण करता आले नाही. तसेच मधल्या फळीतील कर्णधार ऋषभ पंत (५) आणि हार्दिक पंड्या (९) हे फलंदाजही लवकर बाद झाले. यानंतर मात्र अखेरच्या षटकांत अनुभवी दिनेश कार्तिकने (२१ चेंडूंत नाबाद ३०) षटकेबाजी करत भारताला दीडशे धावांसमीप नेले.

**संक्षिप्त धावफलक**

भारत : २० षटकांत ६ बाद १४८ (श्रेयस अय्यर ४०, इशान किशन ३४, दिनेश कार्तिक नाबाद ३०; आनरिख नॉर्किए २/३६) पराभूत वि. दक्षिण आफ्रिका : १८.२ षटकांत ६ बाद १४९ (हेन्रिच क्लासन ८१, टेम्बा बव्हुमा ३५; भुवनेश्वर कुमार ४/१३)

## खेलो इंडिया क्रीडा स्पर्धा

# महाराष्ट्र अग्रस्थानी कायम

### जलतरण, तिरंदाजी, टेबल टेनिसमध्ये सुवर्णभरारी



। पंचकुला । महाईन्यूज ।

महाराष्ट्राने रविवारी खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत चमकदार कामगिरी करत पाच सुवर्ण, तीन रौप्य आणि पाच कांस्यपदकांची कमाई केली. जलतरणात अपेक्षा फर्नांडिसने दोन सुवर्णपदके जिंकत महत्त्वपूर्ण योगदान दिले. यासह तिरंदाजीत साताऱ्याच्या आदिती स्वामीने सुवर्णवेध घेतला. टेबल टेनिसमध्ये दिया चितळेने सुवर्णपदक जिंकले.

युवा खेळाडूंनी केलेल्या या कामगिरीमुळे महाराष्ट्राने पदकतालिकेतील अग्रस्थान कायम राखले आहे. महाराष्ट्राच्या खात्यावर ४१ सुवर्ण, ३६ रौप्य आणि २९ कांस्य अशी एकूण १०६ पदके जमा आहेत. दुसऱ्या स्थानावरील हरयाणाने महाराष्ट्राच्या तुलनेत अधिक पदके मिळवली असली तरी सुवर्णपदकांमध्ये ते पिछाडीवर आहेत. हरयाणाने आतापर्यंत या स्पर्धेत ३९ सुवर्ण, ३४ रौप्य आणि ४२ कांस्य अशी ११५ पदके कमावली आहेत.

**महाराष्ट्राचे दोन्ही खो-खो संघ अंतिम फेरीत**

महाराष्ट्राच्या दोन्ही खो-खो संघांनी खेलो इंडिया स्पर्धेची अंतिम फेरी गाठली. मुलींनी पश्चिम बंगालचा, तर मुलांनी दिल्लीचा पराभव केला. महाराष्ट्राच्या मुलींनी बंगालवर ९-८ (९-३) असा एक डाव व एका गुणाने मात केला. महाराष्ट्रातर्फे अश्विनी शिंदे आणि प्रीती काळेने चांगला खेळ केला. मुलांमध्ये महाराष्ट्राने दिल्लीवर १५-९ (१५-५) असा १ डाव व ६ गुणांनी विजय मिळवला. विजयी संघातर्फे आदित्य कुडाळेने (२.३० मि. संरक्षण व १ बळी) आणि मिलद आर्यन (२.३० मि. संरक्षण आणि एक बळी) यांनी चमक दाखवली.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
708 309 8763

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही